महाराष्ट्र शासन
जिल्हाधिकारी पालघर, जिल्हा - पालघर यांचे कार्यालय
(पुरवठा शाखा)
पार्श्वनाथ-९, बिडको नाका, ता. पालघर, जि. पालघर
दुरध्वनी क्रमांक-०२५२५-२९७०२४ ई-मेल : dsopalghar2014@gmail.com

क्रमांक -पुरवठा/का.१/टे.२/ई लिलाव/कावि/५६६/२०१६ दिनांक- १९/०९/२०१६

**खरीप पणन हंगाम सन २०१२-२०१३ व २०१३-२०१४ मधील खरेदी करण्यांत आलेल्या तथापि भरडाई विना शिल्लक धानाच्या विक्रीसाठी जाहीर ई-लिलाव सुचना**

जाहीर सुचना देण्यांत येते की, केंद्र शासनाच्या किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेअंतर्गत पालघर जिल्हयात खरीप पणन हंगाम २०१२-२०१३ व २०१३-२०१४ मध्ये खरेदी करण्यांत आलेल्या तथापि भरडाई विना शिल्लक असलेल्या धानाची विक्री ई-लिलावाद्वारे संबंधीत गोदामनिहाय " **जेथे आहे व जसे आहे** " या तत्वावर करावयाची आहे. त्यासाठी ई-निविदा प्रक्रियेच्या माध्यमातून धान खरेदी बाबत ई-निविदा मागविण्यांत येत आहेत.

**खरीप पणन हंगाम २०१२-२०१३ व २०१३-२०१४ मधील भरडाई विना शिल्लक धानाच्या साठ्याचा तपशिल पुढीलप्रमाणे**

(आकडे क्विंटल मध्ये)

| अ.नं. | गोदामाचे नांव | खरीप पणन हंगाम | शिल्लक धान | ई-लिलाव दिनांक | ई-लिलावाची वेळ |
|---|---|---|---|---|---|
| १ | साखरे , ता.विक्रमगड , जि.पालघर | २०१२-२०१३ | १२४.९७ | ०७/१०/२०१६ | स.१०.०० ते दु. ३.०० |
| २ | कळंभे, ता.वाडा , जि.पालघर | २०१३-२०१४ | ३७१.५० | ०७/१०/२०१६ | स.१०.०० ते दु. ३.०० |
| | **एकूण** | | **४९६.४७** | | |

१. ई-लिलाव (E-Auction) प्रक्रियेसाठी सर्व इच्छुक निविदाकार /खरेदीदार/कंपनी/फर्म यांना वैयक्तिक डिजिटल स्वांक्षरी सर्टिफिकेट (Digital Signature Certificate) काढणे आवश्यक आहे.
२. डिजिटल स्वाक्षरी प्रमाणपत्र विहीत मुदतीत प्राप्त करून घेऊन ई लिलाव (E-Auction) प्रक्रियेत जास्तीत जास्त निविदाकारांनी सहभाग घ्यावा.
३. इच्छुक निविदाकार यांनी ई निविदेत विहीत मुदतीत भाग घेण्यासाठी http://eauction.gov.in या वेबसाईटवर ऑनलाईन नोंदणी (Online Registration) केलेले असावे आणि लिलाव प्रक्रियेमध्ये भाग घेण्यासाठी अनामत रक्कम रुपये १०,०००/- (अक्षरी रुपये दहा हजार मात्र) चा जिल्हाधिकारी पालघर यांच्या नावे असलेला राष्ट्रीयकृत बँकेचा धनाकर्ष दिनांक ०६/१०/२०१६ रोजी सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत जिल्हाधिकारी कार्यालय, पुरवठा शाखा, पालघर येथे समक्ष सादर करणे आवश्यक राहील.

**वरील ई-लिलाव प्रक्रियेसाठी पुढीलप्रमाणे वेळापत्रक निश्चित करण्यात आले आहे.**

| अ.क्रं. | कालावधी | करावयाची कार्यवाही |
|---|---|---|
| १ | दि. २१/०९/२०१६ ते दि. ०५/१०/२०१६ सायं. ५.३० वाजे पर्यंत | **ई लिलाव** (E-Auction) करणेसाठी संगणकीय नोंदणी(Online Registration) करणे , राष्ट्रीयकृत बँकेच्या धनाकर्षाची प्रत, पॅन कार्ड, टॅन नंबर, सर्टिफिकेट व रहिवासी पुरावा अपलोड करणे. |
| २ | दि. ०६/१०/२०१६ | **ई लिलाव** (E-Auction) करणेसाठी संगणकीय नोंदणी केलेल्या निविदाकाराच्या अर्जाची छाननी करुन पात्र/अपात्र खरेदीदार ठरविणे. |
| ३ | दि. ०७/१०/२०१६ | **ई लिलाव प्रकिया** वरील नमुद केलेल्या वेळेप्रमाणे पूर्ण करण्यांत येईल. |